**ठळक बातम्या**

- राज्यभरात आज मराठी भाषा गौरव दिन साजरा, मुंबईत संध्याकाळी साहित्यिकांना पुरस्कार प्रदान केले जाणार
- एसटी महामंडळाच्या सर्व बसेसमधे सीसीटीव्ही आणि जीपीएस लावण्याचे राज्य सरकारचे आदेश
- उद्योगांनी सरकारवर अवलंबून न राहता स्पर्धेत उतरावं असं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्र्यांचं आवाहन

**आणि**

- नौदलाच्या जहाजविरोधी क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी

<><><><><>

मराठी भाषा गौरव दिन आज राज्यभरात साजरा होत आहे.
२७ फेब्रुवारी हा कविवर्य कुसुमाग्रज म्हणजे विष्णू वामन शिरवाडकर यांचा जन्मदिवस. त्यांच्या जयंतीचं औचित्य साधून हा दिवस साजरा केला जातो. यानिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांनी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या तसंच कुसुमाग्रजांना अभिवादन केलं. ज्येष्ठ नेते शरद पवार आणि काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनीही  कुसुमाग्रजांच्या कार्याचं स्मरण करून त्यांना अभिवादन केलं. तसंच मराठी भाषा गौरव दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

मराठी भाषा गौरव दिनानिमित्त नाशिकच्या शिरवाडे वणी इथं ‘कवितेचं गाव’ साकार होत असल्याची माहिती, मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी दिली. याठिकाणी कुसुमाग्रजांचं साहित्य, कविता आणि अन्य थोर साहित्यिकांचं लेखन संग्रहित केलं जाणार आहे.

महाराष्ट्र पोस्टल सर्कलनं आज मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पोस्ट कार्ड जारी केलं. सुलेखनकार अच्युत पालव आणि लेखक गणेश मतकरी यावेळी उपस्थित होते.

मराठी भाषेच्या गौरवार्थ आणि भाषा आणि साहित्याच्या विकासासाठी कार्यरत असणाऱ्या मान्यवरांच्या सन्मानार्थ, आज मुंबईतल्या गेटवे ऑफ इंडिया इथं संध्याकाळी पुरस्कार सोहळा आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमात विजेत्यांना मराठी साहित्यासाठीचे प्रतिष्ठेचे विविध पुरस्कार

प्रदान करण्यात येणार आहेत. राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या ‘पुस्तक प्रकाशन’ उपक्रमांतर्गत विविध ५१ पुस्तकांचं प्रकाशनही यावेळी होणार आहे.

<><><><><>

सिंधुदुर्ग जिल्ह्यातल्या कुडाळमधल्या बाबा वर्दम थिएटर्स आणि आरती प्रभु कला अकादमी यांच्या वतीनं दिला जाणारा आरती प्रभु पुरस्कार नाटककार प्रशांत दळवी यांना जाहीर झाला आहे. ज्येष्ठ कवयित्री नीरजा यांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान केला जाणार आहे.

<><><><><>

परिवहन सेवेत असलेल्या सर्व बसेसमध्ये सीसीटीव्ही आणि जीपीएस यंत्रणा तातडीनं लावली जाईल, असं परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज मुंबईत सांगितलं. ते बातमीदारांशी बोलत होते.

पुण्यातल्या स्वारगेट एसीटी बस स्थानकात शिवशाही बसमध्ये एका तरुणीवर झालेल्या अत्याचार झाल्याचं उघड झाल्यानंतर राज्यातील सर्व बसडेपोंमध्ये सुरक्षा व्यवस्था अधिक कडक केली जाईल, राज्यातल्या सर्व बस स्थानकांत महिला सुरक्षा कर्मचाऱ्यांची संख्या वाढवणार असल्याचंही सरनाईक यांनी सांगितलं. याप्रकरणी २३ सुरक्षा रक्षकांचं निलंबन केल्याची माहिती त्यांनी दिली.

राज्यातल्या महिलांच्या सुरक्षिततेसाठी एआय तंत्रज्ञानाचा वापर करून उपाय योजना आखणार असल्याची माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज बातमीदारांना दिली. राज्यातील अनेक बस स्थानकांमध्ये बंद पडलेल्या बस आहेत. त्याचा फायदा समाकंटक व्यक्ती घेतात. त्यामुळे बंद पडलेल्या बस गाड्या १५ एप्रिलपर्यंत भंगारात काढल्या जातील, असंही परिवहनमंत्र्यांनी सांगितलं.

<><><><><>

पुण्यातल्या स्वारगेट बस स्थानकातल्या बलात्कार प्रकरणातल्या आरोपीची माहिती देणाऱ्याला एक लाख रुपयांचं बक्षीस पुणे पोलिसांनी जाहीर केलं आहे. या प्रकरणातला आरोपी मंगळवारपासून फरार असून त्याला शोधण्यासाठी १३ पथकं कामाला लागली असल्याचं पोलीस अधिकाऱ्यानं

सांगितलं. आरोपीची माहिती देणाऱ्याची ओळख गुप्त ठेवली  जाईल असंही त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

जागतिक पातळीवरची आव्हानं पेलत भारतीय अर्थव्यवस्था विकासमार्गावर वाटचाल करत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आयोजित माध्यमांशी संवाद कार्यक्रमात आज त्या बोलत होत्या. सध्याच्या काळात जागतिक पुरवठा साखळीत अडथळे उद्भवण्याचा धोका असून आता जगाचं भविष्य केवळ विकसित देशांच्या हाती राहिलेलं नाही, असं त्या म्हणाल्या. नवीन जग व्यापार आणि तंत्रज्ञानातून आकाराला येत असून भारताला त्यादृष्टीने धोरणं आखावी लागतील असं मत त्यांनी व्यक्त केलं. येत्या काळात वाढत्या मध्यमवर्गाच्या तसंच गरीबांच्या आणि उद्योजकांच्या अपेक्षा पूर्ण करण्याचं आव्हान असल्याचं त्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

उद्योगांनी सरकारवर अवलंबून न राहता स्पर्धेत उतरावं असं आवाहन केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी उद्योजकांना केलं. ते आज मुंबईत आयएमसी चेंबर ऑफ कॉमर्सने आयोजित केलेल्या कार्यक्रमात बोलत होते. अनुदान, उच्च आयात शुल्क अशा सरकारच्या मदतीवर कधीपर्यंत अवलंबून राहणार असा प्रश्न त्यांनी विचारला. एक देश म्हणून या सुरक्षित वातावरणातून आणि बचावात्मक पावित्र्यातून बाहेर पडणं गरजेचं आहे,  नवोन्मेष, उत्पादकता वाढवणं, कौशल्य आणि कार्यक्षमता सुधारणं

यातून स्पर्धात्मकता वाढेल असं गोयल म्हणाले. आपण जोपर्यंत स्पर्धात्मक होत नाही, जगासोबतचा व्यापार वाढत नाही तोपर्यंत देशाला विकसित करण्याचं १४० कोटी नागरिकांचं ध्येय साध्य होणार नाही, असं गोयल म्हणाले. उद्योगांनी आपली गुणवत्ता वाढवावी असं आवाहन गोयल यांनी यावेळी केलं. मेक इन इंडियासारख्या उपक्रमांमुळे देश जागतिक बाजारात मोठी भूमिका पार पाडण्यासाठी सज्ज झाला आहे, असंही गोयल म्हणाले.

**<><><><><>**

२०२५-२६ या वर्षाच्या प्रस्तावित अर्थसंकल्पात जहाजबांधणी आणि बंदर क्षेत्राला प्राधान्य देण्यात आलं असून सागरी व्यापार क्षेत्राकरता २५ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे, अशी माहिती केंद्रीय बंदर, नौकानयन आणि जलमार्ग मंत्री सर्वानंद सोनोवाल यांनी दिली. जहाजबांधणी आणि बंदर उद्योग- सागरी व्यापार उद्योगांना प्रोत्साहन, विकसित भारत- अर्थसंकल्प २०२५ या विषयावर मुंबईत आयोजित चर्चासत्रात आज ते बोलत होते. सागरी व्यापार विकास निधी मुळे या उद्योगाला पायाभूत सुविधा विकासाकरता दीर्घ कालीन पतपुरवठा आणि गुंतवणूक  मिळू शकेल असं ते म्हणाले.

या क्षेत्रातले बडे उद्योजक तसंच वरिष्ठ सरकारी अधिकारी या कार्यक्रमाला उपस्थित असून अर्थसंकल्पात या क्षेत्रासाठीच्या तरतुदींविषयी चर्चा होईल.

बंदरांच्या मानांकन प्रणालीचं तसंच राष्ट्रीय एकीकृत बंदर व्यवहार प्रणालीचं उद्घाटन यावेळी सोनोवाल यांच्या हस्ते झालं. भारत ग्लोबल कन्सोर्टियम निर्मितीसाठी दोन समझोता करारांवर यावेळी स्वाक्षऱ्या करण्यात आल्या.

<><><><><>

संरक्षण संशोधन आणि विकास संघटना आणि भारतीय नौदलानं ओडिशातील चंडीपूर इथल्या एकात्मिक चाचणी केंद्रावरून पहिल्याच नौदल जहाजविरोधी क्षेपणास्त्राची यशस्वी उड्डाण चाचणी घेतली. या चाचण्यांमधून भारतीय नौदलाच्या सीकिंग हेलिकॉप्टरमधून जहाजावर क्षेपणास्त्र डागण्याची क्षमता सिद्ध झाली. संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी यशस्वी उड्डाण चाचण्यांसाठी DRDO, भारतीय नौदल आणि उद्योगांचं अभिनंदन केलं. या चाचण्यांमुळं क्षेपणास्त्राचं मॅन-इन-लूप वैशिष्ट्य सिद्ध झाल्याचं संरक्षण मंत्रालयानं एका निवेदनात म्हटलं आहे.

<><><><><>

रणजी करंडक क्रिकेट स्पर्धेच्या विजेतेपदासाठी नागपूर इथं सुरु असलेल्या विदर्भ आणि केरळ यांच्यातल्या अंतिम सामन्यात विदर्भानं पहिल्या डावात सर्वबाद ३७९ धावा केल्या आहेत.

आज सामन्याच्या दुसऱ्या दिवशी विदर्भानं आपला पहिला डाव कालच्या ४ बाद २५४ या धावसंख्येवरून पुढे सुरू केला. संघाच्या २९० धावा झाल्या असताना, शतकवीर दानिश मालेवार १५३ धावांवर बाद झाला. त्यानंतर विदर्भाचे फलंदाज ठराविक अंतराने बाद होत गेले. शेवटच्या गड्यासाठी हर्ष दुबे आणि नचिकेत भुते यांनी ४४ धावांची भागिदारी करत विदर्भाच्या धावसंख्येत मोलाची भर टाकली. केरळच्या वतीनं निधीश आणि एडन ॲपल यांनी प्रत्येकी ३ गडी बाद केले.

त्यानंतर केरळच्या पहिल्या डावाची सुरुवातही डळमळीत झाली. अवघ्या १४ धावांमध्येच केरळचे दोन्ही सलामीवीर तंबूत परतले. या दोघांनाही दर्शन नळकांडे यानं बाद केलं.

शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा पहिल्या डावात केरळच्या २ बाद ४१ धावा झाल्या होत्या.

**<><><><><>**

हिंगोली जिल्ह्यातल्या वसमत तालुक्यातल्या गिरगाव प्राथमिक आरोग्य केंद्राला राष्ट्री य गुणवत्ता आश्वासन मानांकन पुरस्कार प्राप्त झाला आहे. छत्रपती संभाजीनगर विभागातून प्रथम आणि राज्यातून सर्वाधिक गुणांकन आणि मानांकनाचा बहुमान प्राप्त करणारी गिरगाव ही एकमेव आरोग्य संस्था ठरली आहे. त्याबद्दल राज्यभरातून गिरगाव प्राथमिक आरोग्य केंद्राचं कौतुक होत आहे.

**<><><><><>**

नवी मुंबई महानगर पालिका शाळेत आठवी शिकणाऱ्या विद्यार्थ्याचा सहलीवेळी मृत्यू झाल्याप्रकरणी महापालिका आयुक्त डॉ कैलास शिंदे यांनी आज सखोल चौकशीचे आदेश दिले आहेत.

महापालिका आयुक्त शिंदे यांनी शवचिकित्सा अहवाल, पोलीस तपास अहवाल आणि शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी दिलेला वस्तुस्थितीदर्शक अहवाल यांची पडताळणी करण्याचे आदेश  आज प्रशासन विभागाला दिले आहेत.

**<><><><><>**

भंडारा जिल्ह्यातल्या तुमसर इथं भरधाव वाहनाला आग लागल्याचा प्रकार घडला. चालकाच्या सतर्कतेमुळे आग विझविण्यात यश आलं. यात कोणतंही नुकसान झालं नाही.

**//<><><><><>//**